**Q.1**

संधीफोडीबद्दल खालीलपैकी चुकीची जोडी शोधा.

1. खिडकी + आत = खिडकीत
2. घर + ई = घरे
3. हो + ऊ = होऊ
4. गेली + आहे = गेलीय

**Answer:**

**B**

**Sol:**

घर + ई = घरी (पररूप संधी)

---

**Q.2**

मुंबई हे शहर कापडनिर्मितीत अग्रेसर आहे. या वाक्यातील मुंबई हे कोणते नाम आहे?

1. सामान्य नाम
2. विशेष नाम
3. भाववाचक नाम
4. समुदायवाचक नाम

**Answer:**

**B**

**Sol:**

ज्या नामाने जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो, त्यास विशेषनाम असे म्हणतात.
उदा. मुंबई, रामा, हिमालय, गंगा, भारत इत्यादी.

---

**Q.3**

पेन या इंग्रजीतून मराठीत रूढ झालेल्या शब्दाचे लिंग कोणते आहे?

1. पुल्लिंग
2. स्त्रीलिंग
3. नपुसकलिंग
4. पुल्लिंग तसेच नपुसकलिंग

**Answer:**

**D**

**Sol:**

पेन = पुल्लिंग तसेच नपुंसकलिंग

---

**Q.4**

'श्रीकृष्णाने सांदीपनींना गुरुदक्षिणा दिली' या वाक्यातील 'सांदीपनींना' हा शब्द व्याकरणिकदृष्ट्या काय सुचवतो?

1. आदरार्थी अनेकवचन
2. सामान्य नाम
3. क्रियापदाचा कर्ता
4. पुल्लिंग, तृतीया एकवचन

**Answer:**

**A**

**Sol:**

कधी कधी व्यक्ति एक असूनही त्या व्यक्तीबद्दल आदर दाखवण्यासाठी आपण त्या व्यक्तीबद्दल अनेकवचनी प्रयोग करतो, तेंव्हा त्यास आदरार्थी अनेकवचन किंवा आदरार्थी बहुवचन असे म्हणतात.

---

**Q.5**

नीरव या शब्दाचा संधी विच्छेद कसा होतो?

1. नि : + रव
2. नी + रव
3. नी : + रव
4. नि + रव

**Answer:**

**A**

**Sol:**

नीरव = नि : + रव (विसर्ग संधी)

---

**Q.6**

'बदल घडणे' व्याकरणातील या क्रियेला काय म्हटले जाते?

1. सूड
2. वचपा
3. विकार
4. आजार

**Answer:**

**C**

**Sol:**

बदल घडणे किंवा बदल होणे याला व्याकरणात विकार असे म्हणतात.

---

**Q.7**

पासून व पलीकडे या शब्दयोगी अवयांचा उपयोग कोणत्या विभक्ती कार्यासाठी केला आहे?

अचूक पर्याय निवडा.

1. पंचमी व सप्तमी
2. द्‌वितीय, चतुर्थी व पंचमी
3. तृतीय व षष्ठी
4. संबोधन व द्‌वितीया

**Answer:**

**A**

**Sol:**

पासून – पंचमी
पलीकडे – सप्तमी

---

**Q.8**

'बाजारात गारुड्याचा खेळ चालू होता.' या वाक्यात सामान्यरूप असलेला शब्द कोणता आहे?

1. गारुड्याचा
2. खेळ
3. चालू
4. होता

**Answer:**

**A**

**Sol:**

गारुडी – गारुड्याचा हे सामान्य रूप आहे.

---

**Q.9**

"समारंभास नागरिक (मोठी संख्या) ने उपस्थित होते." कंसातील शब्दांचे कोणते रूप येथे योग्य ठरेल?

1. मोठ्या संख्ये.
2. मोठ्या संख्या
3. मोठी संख्या
4. मोठ्या संख्ये

**Answer:**

**D**

**Sol:**

मोठी संख्या – मोठ्या संख्ये हे सामान्य रूप आहे.

---

**Q.10**

ADDA 247 Marathi

"त्याने मला शिवाजी मंदिरात बोलावले, परंतु आपण आलोच नाही!" या वाक्यातील 'आपण' हा शब्द कोणते सर्वनाम दर्शविते?

1. दर्शक सर्वनाम
2. समुदायवाचक सर्वनाम
3. सामान्य सर्वनाम
4. सर्वपरूषवाचक सर्वनाम

**Answer:**

**D**

**Sol:**

आपण – सर्वपुरुषी सर्वलिंगी सर्ववचनी पुरुषवाचक सर्वनाम.

---

**Q.1**

'निक्षून सांगणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ सांगा.

1. चाहूल लागणे
2. काळजी घेणे
3. स्पष्टपणे सांगणे
4. वस्ती करणे

**Answer:**

**C**

**Sol:**

'निक्षून सांगणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ = स्पष्टपणे सांगणे.

---

**Q.2**

विरुद्धार्थी शब्द सांगा.

निर्भर्त्सना **x**_____

1. विस्मृती
2. नकार
3. विरळ
4. स्तुती

**Answer:**

**D**

**Sol:**

निर्भर्त्सना **x** स्तुती

---

**Q.3**

समानार्थी शब्द सांगा.

उतारू =______

1. प्रवासी
2. तिजोरी
3. मोहीम
4. सेवक

**Answer:**

**A**

**Sol:**

उतारू = प्रवासी

---

**Q.4**

खालील आलंकारिक शब्दांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य शब्द निवडा.

मारुतीचे शेपूट -_______

1. मोठे भांडण
2. कठीण प्रतिज्ञा
3. लांबत जाणारे काम
4. अतिशय दुर्मिळ योग


ADDA 247 Marathi

**Answer:**

**C**

**Sol:**

मारुतीचे शेपूट - लांबत जाणारे काम

---

**Q.5**

'भारूड' हा रचना प्रकार संत वाङ्मयात कोणी रुढ केला?

1. संत नामदेव
2. संत ज्ञानेश्वर
3. संत तुकाराम
4. संत एकनाथ

**Answer:**

**D**

**Sol:**

'भारूड' हा रचना प्रकार संत वाङ्मयात (मराठी पद्यवाङ्मयात) संत एकनाथांनी रुढ केला. साध्या रुपकातून धार्मिक व नैतिक तत्वज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले तसेच समाजातील अनिष्ट परंपरांवर ओरखडे ओढले.

---

**Q.6**

व्यंजने स्वरांवर अवलंबून असतात म्हणून त्यांना____ म्हणतात.

1. परवर्ण
2. अर्धस्वर
3. अल्पप्राण
4. महाप्राण

**Answer:**

**A**

**Sol:**

व्यंजने स्वरांवर अवलंबून असतात म्हणून त्यांना परवर्ण म्हणतात.

---

**Q.7**

'वनौषधी' या शब्दाचा संधीविग्रह करा.

1. वन + ऐषधी
2. वन + ओषधि
3. वन + ओशधी
4. वन + औषधी

**Answer:**

**D**

**Sol:**

'वनौषधी' या शब्दाचा संधीविग्रह वन + औषधी असा होतो.

---

**Q.8**

ठेवलेल्या नामाला(नावाला)______ म्हणतात.

1. सामान्यनाम
2. विशेषनाम
3. भाववाचक नाम
4. पदार्थवाचक नाम

**Answer:**

**B**

**Sol:**

ठेवलेल्या नामाला(नावाला) विशेषनाम म्हणतात.

---

ADDA 247 Marathi

**Q.9**

'लाटणे' या नामाचे अनेकवचन कोणते?

1. लाटण
2. लाटणी
3. लाटणे
4. यापैक नाही

**Answer:**

**B**

**Sol:**

'लाटणे' या नामाचे अनेकवचन 'लाटणी' होते

---

**Q.10**

अयोग्य जोडी ओळखा.

1. पुस्तक - नपुंसकलिंगी
2. पोथी - स्त्रीलिंगी
3. ग्रंथ - पुल्लिंगी
4. देवघर - पुल्लिंगी

**Answer:**

**D**

**Sol:**

देवघर - पुल्लिंगी ही अयोग्य जोडी आहे. देवघर हा शब्द नपुंसकलिंगी आहे कारण सामासिक शब्दांचे लिंग शेवटच्या शब्दावरून ठरवतात.

---

**Q.1**

पुढील शब्दातून भाववाचक नाव ओळखा.

1. गुलामगिरी
2. गार
3. चपळ
4. शत्रु

**Answer:**

**A**

**Sol:**

गुलामगिरी हे भाववाचक नाम आहे. गुलाम या नामात बदल करून गुलामगिरी हे भाववाचक नाम तयार होते.

---

**Q.2**

त्याने चित्रपटात काम केले होते. या वाक्याचा काळ ओळखा.

1. साधा भूतकाळ
2. पूर्ण भूतकाळ
3. अपूर्ण भूतकाळ
4. रीती भूतकाळ

**Answer:**

**B**

**Sol:**

वरील वाक्य पूर्ण भूतकाळातील आहे. (काम करण्याची क्रिया पूर्ण झाली होती)

---

**Q.3**

अमृताहूनी गोड नाम तुझे देवा. हे वाक्य कोणत्या अलंकाराचे आहे?

1. अनन्वय
2. व्यतिरेक
3. भ्रांतीमान
4. रुपक

**Answer:**

**B**

**Sol:**

अमृताहूनी गोड नाम तुझे देवा. हे वाक्य व्यतिरेक अलंकाराचे आहे. (उपमेय (देवाचे नाव) हे उपमानापेक्षा (अमृत) श्रेष्ठ आहे असे वर्णन केल्यामुळे हा व्यतिरेक अलंकार आहे.)

---

**Q.4**

जर तू पाढे पाठ केले, तर भविष्यात तुला त्याचा उपयोग होईल. या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

1. स्वार्थ
2. आज्ञार्थी
3. विद्यर्थी
4. संकेतार्थी

**Answer:**

**D**

**Sol:**

वाक्यात जर - तर असल्यामुळे आपण सहजपणे हे वाक्य संकेतार्थी आहे हे सांगू शकतो.

---

**Q.5**

राघवने बॉल पकडला. या वाक्यातील प्रयोग ओळखा.

1. कर्तरी
2. अकर्मक
3. भावे
4. कर्मणी

**Answer:**

**D**

**Sol:**

वरील वाक्य कर्मणी प्रयोगातील आहे. (वाक्यात जर कर्त्याला ने प्रत्यय असेल तर शक्यतो ते वाक्य कर्मणी प्रयोगातील असते.)

---

**Q.6**

तोंडावाटे निघणाऱ्या मुलध्वनींना काय म्हणतात?

1. अनुनासिक
2. वर्ण
3. शब्द
4. व्यंजन

**Answer:**

**B**

**Sol:**

तोंडावाटे निघणाऱ्या मुलध्वनींना वर्ण म्हणतात.

---

**Q.7**

यश + धन = _____

1. यशोधन
2. यशोधोन
3. यशोधना
4. यापैकी नाही

**Answer:**

**A**

**Sol:**

यश + धन = यशोधन

---

**Q.8**

पुस्तक, चेंडू, घड्याळ हे शब्द शब्दांच्या जातींपैकी कोणत्या जातीचे शब्द आहेत?

1. नाम
2. सर्वनाम
3. विशेषण
4. क्रियापद

**Answer:**

**A**

**Sol:**

पुस्तक, चेंडू, घड्याळ हे शब्द नाम आहेत.

---

**Q.9**

विदूर या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द ओळखा

1. विदुषी
2. विदुरीण
3. विधवा
4. सधवा

**Answer:**

**C**

**Sol:**

विदुर या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द विधवा आहे.

---

**Q.10**

नाम किंवा सर्वनामाचे रूप तयार करण्यास जी अक्षरे लागतात त्यांना _____ म्हणतात.

1. शब्द
2. कृदन्त
3. तव्दित
4. प्रत्यय

**Answer:**

**D**

**Sol:**

नाम किंवा सर्वनामाचे रूप तयार करण्यास जी अक्षरे लागतात त्यांना प्रत्यय म्हणतात.

---

**Q.1**

तो सध्या सरकारी पाहूणचार घेत आहे. हे वाक्य कोणत्या अलंकाराचे आहे ?

1. पर्यायोक्त
2. व्याजोक्ती
3. चेतनगुणोक्ती
4. रुपक

**Answer:**

**A**

**Sol:**

वरील वाक्य पर्यायोक्त अलंकाराचे आहे. (एखादी गोष्ट प्रत्यक्ष न सांगता ती अप्रत्यक्ष रीतीने सांगणे. जसे की यात सरकारी पाहुणचार घेत आहे म्हणजे तुरुंगात आहे.)

---

**Q.2**

रिकामटेकडा हा शब्द कोणत्या भाषेतून मराठी भाषेत आला आहे?

1. तामिळी
2. तेलगू
3. गुजराथी
4. हिंदी

ADDA 247 Marathi

**Answer:**

**C**

**Sol:**

रिकामटेकडा हा शब्द गुजराथी भाषेतून मराठी भाषेत आला आहे.

---

**Q.3**

तिने कविता वाचली. या वाक्याचा प्रयोग ओळखा.

1. शक्य कर्मणी
2. प्रधानकर्तृक कर्मणी
3. कर्मकर्तरी
4. यापैकी नाही

**Answer:**

**B**

**Sol:**

वरील वाक्य प्रधानकर्तुक कर्मणी प्रयोगाचे आहे.

---

**Q.4**

स, ला, ते, हे प्रत्यय कोणत्या विभक्तीचे आहे?

1. प्रथमा
2. व्दितीया
3. चतुर्थी
4. दोन्ही **b** व **c**

**Answer:**

**D**

**Sol:**

दोन्ही **b** व **c** (स, ला. ते हे प्रत्यय द्वितीया व चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय आहे)

---

**Q.5**

माझे पुस्तक कुठे आहे? या वाक्यातील विशेषणाचा प्रकार ओळखा.

1. अनिश्चित विशेषण
2. गणनावाचक विशेषण
3. सार्वनामिक विशेषण
4. आवृत्तिवाचक संख्याविशेषण

**Answer:**

**C**

**Sol:**

या वाक्यातील विशेषण माझे हे आहे. मी या सर्वनामात बदल होवून माझे हे सार्वनामिक विशेषण तयार झाले आहे.

---

**Q.6**

क्रियापदावरून आशीर्वाद देणे, प्रार्थना करणे, विनंती करणे व उपदेश करणे याचा बोध होत असेल तर त्या क्रियापदास ____ म्हणतात.

1. स्वार्थ
2. आज्ञार्थ
3. विध्यर्थ
4. संकेतार्थ

**Answer:**

**B**

**Sol:**

क्रियापदावरून आशीर्वाद देणे, प्रार्थना करणे, विनंती करणे व

उपदेश करणे याचा बोध होत असेल तर त्या क्रियापदास आज्ञार्थ क्रियापद म्हणतात.

---

**Q.7**

मोठ्यांचा आदर करावा. वाक्याचा अर्थ न बदलता वाक्य नकारार्थी करा.

1. मोठ्यांचा अनादर करू नये.
2. मोठ्यांचा आदर करू नये.
3. मोठ्यांचा आदर का करू नये.
4. मोठ्यांचा अनादर करावा.

**Answer:**

**A**

**Sol:**

मोठ्यांचा अनादर करू नये.

---

**Q.8**

कोण आले ते मला माहीत नाही वाक्यात कोणते विरामचिन्ह वापरावे?

1. अवतरण चिन्ह
2. प्रश्न चिन्ह
3. पूर्णविराम
4. उद्गारचिन्ह

**Answer:**

**C**

**Sol:**

हे केवल वाक्य असल्याने वाक्याच्या शेवटी पूर्णविराम वापरावे.

---

**Q.9**

एकाला उद्देशून पण दुसऱ्याला लागेल असे बोलणे या अर्थाची म्हण पर्यायातून निवडा.

1. चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे
2. दे माय धरणी ठाय
3. मनात मांडे खाणे
4. लेकी बोले सुने लागे

**Answer:**

**D**

**Sol:**

लेकी बोले सुने लागे = एकाला उद्देशून पण दुसऱ्याला लागेल असे बोलणे.

---

**Q.10**

योग्य ध्वनीदर्शक शब्द ओळखा.

माकडांचा भूभू:कार तसा हत्तीचा

1. टणत्कार
2. चित्कार
3. घुत्कार
4. सुत्कार

**Answer:**

**B**

**Sol:**

हत्तीचा - चित्कार

---

**Q.1**

दिलेल्या शब्दातील शब्दयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.

'आज्ञेबरहुकूम'

1. हेतुवाचक
2. संबंधवाचक
3. भागवाचक
4. योग्यतावाचक

**Answer:**

**D**

**Sol:**

योग्यतावाचक शब्दयोगी अव्यय - समान, सम, जोगा, सारखा, योग्य, प्रमाणे, बरहुकूम इ.

---

**Q.2**

'मनस्ताप' हा शब्द खालीलपैकी कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?

1. पररुप संधी
2. पूर्वरूप संधी
3. व्यंजन संधी
4. विसर्ग संधी

**Answer:**

**D**

**Sol:**

मन: + ताप = मनस्ताप

---

**Q.3**

वचनभेदाप्रमाणे बदलणारी सर्वनामे किती आहेत ?

1. सहा
2. चार
3. पाच
4. तीन

**Answer:**

**C**

**Sol:**

नऊ सर्वनामांपैकी फक्त पाच सर्वनामे वचनभेदानुसार बदलतात.
(1) मी - आम्ही (2) तू - तुम्ही (3) तो, ती, ते, त्या
(4) हा, ही, हे, ह्या (5) जो, जी, जे, ज्या

---

**Q.4**

गटात न बसणारा पर्याय निवडा

1. चित्कारणे
2. खडे फोडणे
3. हंबरने
4. डरकाळी फोडणे

**Answer:**

**B**

**Sol:**

खडे फोडणे

---

**Q.5**

'खेडे' या शब्दाचा अनेकवचनी रूप कोणते ?

1. खेड्या
2. खेडे
3. खेडी
4. खेडा

**Answer:**

**C**

**Sol:**

खेडी

---

**Q.6**

पुढील पैकी स्पर्श व्यंजन कोणते ?

1. अ-आ
2. च्-ट्
3. य-र
4. श-स

**Answer:**

**B**

**Sol:**

च्-ट्

---

**Q.7**

'मी निबंध लिहितो' अपूर्ण भविष्यकाळ करा.

1. मी निबंध लिहीत असेन
2. मी निबंध लिहीन
3. मी निबंध लिहीत जाईन
4. वरील एकही पर्याय योग्य नाही

**Answer:**

**A**

**Sol:**

मी निबंध लिहीत असेन

---

**Q.8**

उपमेयासारखेच उपमेय, त्याला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नाही, असे वर्णन केल्याने ....... अलंकार होतो.

1. भ्रांतिमान
2. अपन्हुती
3. अनन्वय
4. अतिशयोक्ती

**Answer:**

**C**

**Sol:**

उपमेयासारखेच उपमेय, त्याला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नाही, असे वर्णन केल्याने अनन्वय
अलंकार होतो.

---

**Q.9**

'होकार, प्रतिकार, उपहार, जनता' हे अनुक्रमे कोणत्या प्रकारची शब्द आहेत?

1. उपसर्गघटित, साधित, साधित, सिद्ध
2. सिद्ध, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित
3. प्रत्ययघटित, साधित, साधित, उपसर्गघटित
4. साधित, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित

**Answer:**

**D**

**Sol:**

साधित, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित

---

**Q.10**

नेआण या शब्दाचा समास कोणता?

1. द्वंद्व समास
2. बहुव्रिही समास
3. समाहार समास
4. इतरेतर द्वंद्व समास

**Answer:**

**D**

**Sol:**

इतरेतर द्वंद्व समास :
या सामासिक शब्दाचा विग्रह करताना आणि, व या

ADDA 247 Marathi

समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा वापर करावा लागतो. यातील दोन्ही घटक महत्त्वाचे व आवश्यक असतात.
ने-आण - ने आणि आण

---

**Q.1**

महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख कोणते?

खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून लिहिलेले, समाजात सर्व थरात निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणि त्याला मार्गदर्शन करीत राहील.

बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशाली साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते की, एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल.

'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. ते अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गि-हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथाचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे.

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतीमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.
वाङ्मय सहेतुक असावी की नाही त्यात बोध असावा की नाही, या वादात मी पडत नाही, पण एवढे मात्र मी म्हणेन की, वाङ्मय आणि माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

1. भक्ती आणि बुद्धी
2. भक्ती आणि शक्ती
3. बुद्धी आणि शक्ती
4. बुद्धी आणि युक्त

**Answer:**

**A**

**Sol:**

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत.

---

**Q.2**

साहित्यिक अभिरुची वाढविण्यासाठी काय केले पाहिजे असे लेखकास वाटते?

खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून लिहिलेले, समाजात सर्व थरात निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणि त्याला मार्गदर्शन करीत राहील.

बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशाली साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण

मानले पाहिजे. मला असे वाटते की, एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल.

'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. ते अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गि-हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथाचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे.

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतीमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.

वाङमय सहेतुक असावी की नाही त्यात बोध असावा की नाही, या वादात मी पडत नाही, पण एवढे मात्र मी म्हणेन की, वाङमय आणि माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

1. औद्योगिक विस्तार करणे
2. पुस्तकाचे सुबक प्रकाशन व प्रसार
3. सामाजिक बदल होणारे लेखन
4. ग्रंथालये निर्माण करणे

**Answer:**

**B**

**Sol:**

साहित्यिक अभिरुची वाढविण्यासाठी पुस्तकाचे सुबक प्रकाशन व प्रसार केले पाहिजे असे लेखकास वाटते.

---

**Q.3**

प्रस्तुत उताऱ्याच्या लेखकाच्या मते साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण कोणते ?

खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून लिहिलेले, समाजात सर्व थरात निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणि त्याला मार्गदर्शन करीत राहील.

बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशाली साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते की, एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल.

'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. ते अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गि-हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथाचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे.

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतीमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.

वाङमय सहेतुक असावी की नाही त्यात बोध असावा की नाही, या वादात मी पडत नाही, पण एवढे मात्र मी म्हणेन की, वाङमय आणि माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

1. साहित्याची विपुलता
2. साहित्याची समाजाभिमुखता
3. साहित्याची श्रेष्ठता
4. साहित्याची प्रतिष्ठा

**Answer:**

B

**Sol:**

प्रस्तुत उताऱ्याच्या लेखकाच्या मते साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण साहित्याची समाजाभिमुखता आहे.

---

**Q.4**

पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्ट कोणते ?

खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून लिहिलेले, समाजात सर्व थरात निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणि त्याला मार्गदर्शन करीत राहील.

बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशाली साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते की, एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल.

'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. ते अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गि-हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथाचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे.

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतीमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.

वाङ्मय सहेतुक असावी की नाही त्यात बोध असावा की नाही, या वादात मी पडत नाही, पण एवढे मात्र मी म्हणेन की, वाङ्मय आणि माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

1. जगातील जुन्या प्रवाहांची समीक्षा करणे.
2. केवळ धार्मिक साहित्य तयार करणे.
3. उत्कृष्ट साहित्य तयार करणे.
4. बुद्धीची कुवत वाढविणे.

**Answer:**

D

**Sol:**

पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्ट बुद्धीची कुवत वाढविणे हे आहे.

---

**Q.5**

लेखकांवर कोणती मोठी जबाबदारी आहे ?

खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून लिहिलेले, समाजात सर्व थरात निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणि त्याला मार्गदर्शन करीत राहील.

बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशाली साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करून भागणार नाही तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे

आवश्यक आहे. महाराष्ट्रात आत्ता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते की, एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल.

'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. ते अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गि-हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथाचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे.

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतीमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.

वाङमय सहेतुक असावी की नाही त्यात बोध असावा की नाही, या वादात मी पडत नाही, पण एवढे मात्र मी म्हणेन की, वाङमय आणि माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

1. समाजाला शांतीचा, समाधानाचा, मूल्याधिष्ठित आनंदमय मार्ग दाखविणे.
2. समाजातील सहकार्य आणि स्नेह वाढविण्यात मदत करणे.
3. वाङमयाने माणसाची मने मोठी करणे.
4. यापैकी नाही

**Answer:**

**B**

**Sol:**

अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसातील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे.

---

**Q.6**

'रामाला चौघे भाऊ आहेत.' या वाक्यातील संख्याविशेषणाचा प्रकार ओळखा ?

1. गणनावाचक संख्याविशेषण
2. क्रमवाचक संख्याविशेषण
3. आवृत्तीवाचक संख्याविशेषण
4. पृथकवाचक संख्याविशेषण

**Answer:**

**A**

**Sol:**

चौघे (चारही) ही निश्चित संख्या आहे म्हणून या विशेषणाचा प्रकार गणनावाचक संख्याविशेषण ठरतो तर उपप्रकार साकल्यवाचक संख्याविशेषण ठरतो.

---

**Q.7**

ख, घ, छ, झ, ह्या व्यंजनांना कोणते व्यंजन म्हणतात?

1. अल्पप्राण
2. महाप्राण
3. अल्पप्राम व महाप्राण
4. वरीलपैकी एकही नाही

**Answer:**

**B**

**Sol:**

उच्चार करताना हवा मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असेल तर तो वर्ण महाप्राण असतो. अशा वर्णात 'ह' ची छटा असते.

---

**Q.8**

'सज्जन' या शब्दातील संधीचा प्रकार कोणता?

1. स्वरसंधी
2. विसर्गसंधी
3. व्यंजनसंधी

4. सजातीय

**Answer:**

**A**

**Sol:**

स्वरसंधी
सत्+ जन= सज्जन ही व्यंजन संधी आहे.

---

**Q.9**

शहणा, शहाणपण हे कोणत्या प्रकारचे नाम आहे.

1. भाववाचक नाम
2. विशेषनाम
3. समुदायवाचक नाम
4. सामान्य नाम

**Answer:**

**A**

**Sol:**

काल्पनिक घटकाचे नाम भाववाचक असते.

---

**Q.10**

थोरांची आज्ञा पाळावी या वाक्यातील क्रियापद कसे आहे

1. स्वार्थी
2. आज्ञार्थी
3. संकेतार्थी
4. विध्यर्थी

**Answer:**

**D**

**Sol:**

वरील वाक्य कर्तव्य व्यक्त करणार आहे. कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध देणारे क्रियापद विध्यर्थी असते.

---

ADDA 247 Marathi